**University of Mumbai**

अवैध साधन चौकशी विभाग
परीक्षा विभाग, महात्मा जोतिराव
फुले भवन, विद्यानगरी, कलिना,
सांताक्रुझ (पूर्व), मुंबई ४०० ०९८

क्र.परीक्षा/अवैध साधन/ ९८०० /२०१९

## परिपत्रक :—

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, संलग्नीत/संचालित महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे संचालक/समन्वयक यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, विद्यापीठ परीक्षेदरम्यान विविध परीक्षा केंद्रातून अध्यादेश O.५०५० अंतर्गत बरीच कॉपी प्रकरणे प्राप्त होतात काही वेळेस सदर प्रकरणांसंबंधित चौकशी करीता कनिष्ठ व वरिष्ठ पर्यवेक्षक(Sr./Jr.Supervisor) यांना पत्रांद्वारे पाचारण केले जाते.

अवैध साधन सामुग्री चौकशीसाठी पाचारण केल्यानंतर असे निदर्शनास येते की, बरेचशी महाविद्यालयांमधील कनिष्ठ व वरिष्ठ पर्यवेक्षक चौकशीसाठी हजर राहत नाहीत.या संबंधीची बाब दिनांक २२ ऑगस्ट,२०१९ रोजी झालेल्या विद्यापीठाच्या परिक्षा मंडळाच्या बैठकीसमोर सादर केली असता परिक्षा मंडळाच्या ठरावानुसार आपणास असे निर्देश देण्यात येत आहे कि, महाविद्यालयाचे प्राध्यापक/शिक्षक/कनिष्ठ पर्यवेक्षक/वरिष्ठ पर्यवेक्षक यांना विद्यापीठाच्या अवैध साधन सामुग्री चौकशी समिती समोर चौकशीसाठी पाचारण केल्यावर संबंधितांनी उपस्थित राहून सहकार्य करावे.

(डॉ. विनोद पाटील)
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

स्थळ : मुंबई
दि : २८ नोव्हेंबर, २०१९

अ प्रत माहितीस्तव अग्रेषित:-

१ संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, मुंबई विद्यापीठ

ब प्रत माहितीस्तव व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित:-

१. संचालक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग
२. उपकुलसचिव, पात्रता व नोंदणी विभाग
३. सर्व उपकुलसचिव, परीक्षा विभाग
४. सर्व सहायक कुलसचिव, परीक्षा विभाग

क प्रत माहितीसाठी अग्रेषित:-

१. मा कुलगुरू यांचे कार्यकारी सचिव
२. मा प्र कुलगुरू यांचे स्विय सहायक
३. मा संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ यांचे स्विय सहायक
४. कुलसचिव यांचे स्विय सहायक
५. संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ यांचे स्विय सहायक